महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे ,फी,नियत कालमर्यादा ,पदनिर्देशित अधिकारी,प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-१०१९/प्र.क्र.१२३/प्रशासन-१

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई,०३२ ४००

दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९

वाचा- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश ,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५), दिनांक २८.०४.२०१५

प्रस्तावना

सार्वजनिक जीवनातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रांच्या शाश्वत विकासासाठी सुप्रशासन अत्यावश्यक आहे. प्रशासनातील पारदर्शकता,उत्तरदायित्व व प्रतिसादशीलता हे सुप्रशासनाचे तीन अत्यावश्यक घटक आहेत . जनता व प्रशासन यामधील संबंध सुधारण्यासाठी व ते बळकट करण्यासाठी, प्रशासनामध्ये जबाबदारी , उत्तरदायित्व व पारदर्शकता आणणे आवश्यक आहे. विहित कालमर्यादेत लोकसेवा देण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ दिनांक २८.४.२०१५ रोजी राज्यात लागू करण्यात आला आहे .या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत या अध्यादेशाखाली पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवांबाबतचा तपशील अधिसूचित करणे आवश्यक आहे.यामध्ये विभागाव्दारे पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा ,त्या देण्यासाठी जबाबदार पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि सेवा पुरविण्याची विहित कालमर्यादा घोषित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

२. या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील वस्तू व सेवा कर विभागाकडून वेगवेगळया सेवा पुरविण्यात येतात. त्यामधील ज्या सेवा महत्वपूर्ण आहेत अशा सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ मधील कलम ३ नुसार अधिसूचित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१. या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या सेवा राज्यकर आयुक्त , वस्तू व सेवा कर यांच्या कार्यालयामार्फत तात्काळ अधिसूचित कराव्या.

२. अध्यादेशातील तरतूदीनुसार उपरोक्तनुसार सेवा अधिसूचित केल्यानंतर या सेवा देण्यास जबाबदार पदनिर्देशित अधिकारी ,प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिसूचित केलेल्या सेवा पुरविण्याची जबाबदारी राहील.

३. या शासन निर्णयासोबच्या परिशिष्ट-अ, मध्ये नमूद केलेल्या सेवांमध्ये अथवा सेवा पुरविण्याकरीता आकारवयाची फी, विहित नमुना, आवश्यक कागदपत्रे व सेवा पुरविण्याची कालमर्यादा, तसेच या सेवा देण्यासाठी पदनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी , प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी इत्यादींमध्ये संबधित कार्यालय प्रमुखांना/विभाग प्रमुखांना शासनाच्या मान्यतेने सुधारणा करता येतील.

४. उपरोक्त नुसार सेवा अधिसूचित करण्यात आल्यानंतर या लोकसेवाची सूची ,विहीत कालमर्यादा , विहित अर्ज व नमुने, सेवेसंदर्भातील शुल्क ,पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशिल कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच त्यांच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर प्रदर्शित करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२७१७३२३६०४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rekha S Kalsekar

Digitally signed by Rekha S Kalsekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed25b1625624e1b981f13909b95f1ca9e2e382c505e6733f3dc4e0289a69195a, serialNumber=01055700341e68a441f756d47c59a2cd2e3cf8dfdbd78941136e7c9b06a36491, cn=Rekha S Kalsekar
Date: 2019.02.28 17:54:38 +05'30'

(रेखा काळसेकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
४. मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त)/प्रधान सचिव (ले.व को.)/प्रधान सचिव (वि.सु.)/सचिव (व्यय), मंत्रालय, मुंबई,
७. राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. आयुक्त, राज्य लॉटरी संचालनालय, मुंबई,
९. उपसचिव (कराधान), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सहसचिव/उपसचिव (र.व.का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व सह/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. नोडल अधिकारी (लोकसेवा हक्क), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. निवडनस्ती (प्रशासन-१).

परिशिष्ट-अ

अ. क्र.	लोकसेवेचे नाव	लोकसेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस)	अर्जाचा विहित नमुना व असल्यास शुल्क	पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपील प्राधिकारी	द्वितीय अपील प्राधिकारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१)	**मूल्यवर्धित कर कायदा २००२, केंद्रिय विक्रीकर कायदा १९५६, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ अंतर्गत ई-नोंदणी**					
	१) इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन नोंदणी अर्जाचे नमुने विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे.	सेवा तात्काळ (२४*७)	इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन नोंदणी अर्जाचा नमुना विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.	पूर्णपणे ऑनलाइन आहे	नोंदणी अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.	नोंदणी अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.
	२) नोंदणी अर्ज स्वीकारणे	सेवा तात्काळ (२४*७). परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्ज विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिकली स्विकारण्यात येऊन तात्काळ पोचपावती देण्यात येते.	मूल्यवर्धित कर कायदा, २००२ अंतर्गत रुपये ५००/- इतके ई-नोंदणी शुल्क (उलाढालीची विहित मर्यादा पूर्ण केलेल्या प्रकरणांत), केंद्रिय विक्रीकर कायदा, १९५६ अंतर्गत रुपये २५/- इतके ई-नोंदणी शुल्क, मूल्यवर्धित कर कायदा, २००२ अंतर्गत स्वेच्छा नोंदणीसाठी रुपये ५०००/- इतके ई-नोंदणी शुल्क आणि महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ अंतर्गत नोंदणी शुल्क नाही.	पूर्णपणे ऑनलाइन आहे	परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्जच विभागाच्या संकेतस्थळावर स्विकारले जातात. उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज स्विकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.	परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्जच विभागाच्या संकेतस्थळावर स्विकारले जातात. उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज स्विकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.
	३) नोंदणी अर्ज सर्व दृष्टीने परिपुर्ण असेल तर नोंदणी दाखला क्रमांक देणेबाबत.	(i) मूल्यवर्धित कर कायदा, २००२, केंद्रिय विक्रीकर	निःशुल्क	स्तंभ क्र. (३) मधील (i) साठी:	(अ) स्तंभ क्र. (३) मधील (i) साठी:अर्ज	(आ) स्तंभ क्र. (३) मधील (i) साठी: प्रथम

		कायदा, १९५६ आणि महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ ह्यासाठी एकच नोंदणी अर्ज केला असल्यास तपासणीअंती ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (तपासणी कालावधी धरून) नोंदणी दाखला क्रमांक दिला जाईल. नोंदणी क्रमांक नाकारला तर कारणासह अर्जदारास याबाबत ७ कामकाजाच्या दिवसात ई-मेल द्वारे कळविण्यात येईल. (ii) जर अर्जदाराने केवळ महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ अंतर्गत नोंदणी अर्ज केला असल्यास एक दिवसात नोंदणी दाखला क्रमांक दिला जाईल.		नोडल विभागाचा संबंधित राज्यकर अधिकारी	परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त असल्यास सिस्टीम जनरेटेड नोंदणी क्रमांक विहित मुदतीत निर्माण केला जातो. त्यामुळे त्याविरुद्ध अपिलाची आवश्यकता नाही. मात्र सेवा उल्लेखित कालावधीत प्राप्त झाली नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. (ब) स्तंभ क्र. (३) मधील (ii) साठी: सोबतच्या जोडपत्रानुसार.	अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी (ब) स्तंभ क्र. (३) मधील (ii) साठी: सोबतच्या जोडपत्रानुसार .
२)	**केन्द्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत ई -केंद्रिय विक्रीकर वैधानिक नमुने**					
	१) केन्द्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत वैधानिक ई-नमुने मिळण्यासाठीच्या अर्जाचे नमुने विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध करणे.	सेवा तात्काळ (२४*७)	निःशुल्क	संबंधित नोडल अधिकारी	स्तंभ क्र. (२) मध्ये उल्लेखित अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.	स्तंभ क्र. (२) मध्ये उल्लेखित अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.
	२) केन्द्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत वैधानिक ई-नमुन्यांच्या पुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या अर्जाचा	सेवा तात्काळ (२४*७). परिपुर्ण, वैध आणि अचूक अर्ज	निःशुल्क	संबंधित नोडल अधिकारी	केवळ परिपुर्ण, वैध आणि अचूक अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर	केवळ परिपुर्ण, वैध आणि अचूक अर्ज विभागाच्या

	स्विकार करणे व पोचपावती देणे.	विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिकली स्वीकारण्यात येऊन तात्काळ पोचपावती देण्यात येते.			स्वीकारले जातात त्यामुळे उपरोक्त निकषात न बसणारे अर्ज सिस्टिम कडून स्विकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.	संकेतस्थळावर स्वीकारले जातात त्यामुळे उपरोक्त निकषात न बसणारे अर्ज सिस्टिम कडून स्विकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.
	३) व्यापाऱ्यास त्यांच्या ई -मेल वर डिजिटल स्वाक्षरी केलेले वैधानिक नमुने उपरोक्त २(२) नुसार केलेल्या तपशिलाच्या अनुषंगाने उपलब्ध करून देणे.	परिपूर्ण, वैध आणि अचूक अर्ज असल्यास ई-सीएसटी नमुने तपासणीअंती ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (तपासणी कालावधी धरून) विभागातर्फे व्यापाऱ्याच्या नोंदीत ई-मेल आय डी वर पाठविण्यात येतील.	निःशुल्क	संबंधित नोडल अधिकारी	अर्ज परिपूर्ण, वैध आणि अचूक असल्यास सिस्टिम द्वारा डिजिटल स्वाक्षरी केलेले वैधानिक ई-सीएसटी नमुने विहित मुदतीत जारी केले जातात. त्यामुळे त्याविरुद्ध अपिलाची आवश्यकता नाही. मात्र सेवा उल्लेखित कालावधीत प्राप्त झाली नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी.	प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी
३)	**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा, २००२, केंद्रिय विक्रीकर कायदा, १९५६ आणि महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ अंतर्गत ई - विवरणे**					
	१) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा, २००२ व केंद्रिय विक्रीकर कायदा, १९५६ आणि महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ अंतर्गत ई- विवरण पत्रांचे नमुने विभागाच्या www.mahagst.gov.in या	सेवा तात्काळ (२४*७)	निःशुल्क	हया सेवेत काही अडचणी आल्यास व्यापारी विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर किंवा थेट	पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी

	संकेतस्थळावर उपलब्ध करणे.			संबंधित नोडल अधिकाऱ्याकडे किंवा विभागाने पुरविलेल्या फोन क्रमांकावर तक्रार नोंदवू शकतात. तदनंतर पदनिर्देशित अधिकारी (राज्यकर उप आयुक्त, सहाय्यक राज्यकर आयुक्त, राज्यकर अधिकारी) यांचे मार्फत तक्रारींचे निवारण केले जाते.		
	२) विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर दाखल झालेल्या ई -विवरणपत्रांची स्वीकृती पश्चात पोचपावती उपलब्ध करणे.	ई-विवरण सबमिट केल्यानंतर लगेच.	अ) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा व केंद्रिय विक्रीकर कायदा: १) विहित मुदतीत ई-विवरणपत्र दाखल केल्यास निःशुल्क. २) ई-विवरणपत्र विहित कालावधी पासून १ महिन्याच्या आत दाखल केल्यास रुपये १०००/- एवढे विलंब शुल्क लागू आहे. ३) विहित मुदतीपासून १ महिन्यानंतर ई-विवरणपत्र दाखल केल्यास रुपये ५०००/- एवढे विलंब शुल्क लागू आहे. ब) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा:	केवळ परिपूर्ण, वैध व अचूक असलेली विवरणपत्रे विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड केली जातात. हया सेवेत काही अडचणी आल्यास व्यापारी विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर किंवा थेट संबंधित नोडल अधिकाऱ्याकडे किंवा विभागाने पुरविलेल्या फोन क्रमांकावर तक्रार नोंदवू शकतात. तदनंतर पदनिर्देशित अधिकारी (राज्यकर उप	पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी

			विहित कालावधीत ई-विवरणपत्र दाखल केल्यास रुपये १०००/- एवढे विलंब शुल्क लागू आहे.	आयुक्त, सहाय्यक राज्यकर आयुक्त, राज्यकर अधिकारी) यांचे मार्फत तक्रारींचे निवारण केले जाते.		
४)	**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा, २००२, केंद्रिय विक्रीकर कायदा, १९५६ आणि महाराष्ट्र राज्य व्यवसाय, धंदे, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा, १९७५ अंतर्गत ई-करभरणा**					
	१) विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर व्यापारी त्याचा लॉग इन आय डी व पासवर्ड वापरून महाराष्ट्र कोषागार नियमा अंतर्गत विहित चलनाचा नमुना MTR-६ मध्ये ई-पेमेंट करू शकतो.	सेवा तात्काळ (२४*७)	निःशुल्क	हया सेवेत काही अडचणी आल्यास व्यापारी विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर किंवा थेट संबंधित नोडल अधिकाऱ्याकडे किंवा विभागाने पुरविलेल्या फोन क्रमांकावर तक्रार नोंदवू शकतात. तदनंतर पदनिर्देशित अधिकारी (राज्यकर उप आयुक्त, सहाय्यक राज्यकर आयुक्त, राज्यकर अधिकारी) यांचे मार्फत तक्रारींचे निवारण केले जाते.	पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी

जोडपत्र			
अ.क्र.	**कार्यालयाचे ठिकाण**	**प्रथम अपिलीय अधिकारी**	**द्वितीय अपिलीय अधिकारी**
१	अहमदनगर	AHM-VAT-E-001	NAS-PTO-F-001
२	अकोला	AKO-VAT-E-001	NAG-PTO-F-001
३	अलिबाग	ALI-VAT-E-001	THA-PTO-F-001
४	अमरावती	AMR-VAT-E-001	NAG-PTO-F-001
५	औरंगाबाद	AUR-VAT-E-001	NAS-PTO-F-001
६	बार्शी	BAR-VAT-D-001	KOL-PTO-F-001
७	बीड	BEE-VAT-D-001	NAS-PTO-F-001
८	भंडारा	BHA-VAT-D-001	NAG-PTO-F-001
९	भायंदर	BHY-VAT-E-001	THA-PTO-F-001
१०	चंद्रपूर	CHA-VAT-E-001	NAG-PTO-F-001
११	धुळे	DHU-VAT-E-001	NAS-PTO-F-001
१२	गडचिरोली	GAD-VAT-D-001	NAG-PTO-F-001
१३	गोंदिया	GON-VAT-E-001	NAG-PTO-F-001
१४	हिंगोली	HIN-VAT-D-001	NAG-PTO-F-001
१५	जळगाव	JAG-VAT-E-001	NAS-PTO-F-001
१६	जालना	JAL-VAT-E-001	NAS-PTO-F-001
१७	कल्याण	KAL-VAT-E-001	THA-PTO-F-001
१८	खामगाव	KHA-VAT-E-001	NAG-PTO-F-001
१९	कोल्हापूर	KOL-VAT-E-001	KOL-PTO-F-001
२०	लातूर	LAT-VAT-E-001	NAG-PTO-F-001
२१	मालेगाव	MAL-VAT-E-001	NAS-PTO-F-001
२२	मुंबई	MUM-PTO-E-001	MUM-PTO-F-001
२३	नागपूर	NAG-PTO-E-001	NAG-PTO-F-001
२४	नांदेड	NAN-VAT-E-001	NAG-PTO-F-001
२५	नंदूरबार	NAD-BCP-E-001	NAS-PTO-F-001
२६	नाशिक	NAS-VAT-E-001	NAS-PTO-F-001
२७	ओरस	ORO-VAT-E-001	KOL-PTO-F-001
२८	उस्मानाबाद	OSM-VAT-D-001	KOL-PTO-F-001
२९	पालघर	PAL-VAT-E-001	THA-PTO-F-001
३०	परभणी	PAR-VAT-D-001	NAG-PTO-F-001
३१	पूणे	PUN-PTO-E-001	PUN-PTO-F-001
३२	रायगड	RAI-VAT-E-001	THA-PTO-F-001
३३	रत्नागिरी	RAT-VAT-E-001	KOL-PTO-F-001
३४	सांगली	SAN-VAT-E-001	KOL-PTO-F-001

३५	सातारा	SAT-VAT-E-001	KOL-PTO-F-001
३६	सोलापूर	SOL-VAT-E-001	KOL-PTO-F-001
३७	ठाणे	THA-VAT-E-001	THA-PTO-F-001
३८	वर्धा	WAR-VAT-D-001	NAG-PTO-F-001
३९	वाशिम	WAS-VAT-D-001	NAG-PTO-F-001
४०	यवतमाळ	YAV-VAT-E-001	NAG-PTO-F-001

Annexure-A

Sr. No.	Name of the Public Service	Time limit for providing the Public Service (Working Days)	Application Form and Fee (if applicable)	Designated Officer	First Appellate Authority	Second Appellate Authority
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)
(1)	**e-Registration under the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (MVAT Act), Central Sales Tax Act, 1956 (CST Act) and Maharashtra State Tax on Professions, Trade, Callings and Employments Act, 1975 (PT Act).**					
	1) Making available e-Registration Form electronically online on the portal of the Department www.mahagst.gov.in	Immediate (24*7).	Online e-Registration Form is available on the portal of the Department www.mahagst.gov.in	It is totally online	As registration Form is available on the portal of the Department, there is no need of the Appeal.	As registration Form is available on the portal of the Department, there is no need of the Appeal.
	2) Accepting Registration Applications	Immediate (24*7). Only fully filed, valid and correct e-Registration Forms are uploaded on the website of the Department www.mahagst.gov.in and acknowledgement is immediately given.	Under the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (MVAT Act), e-Registration Fee is applicable at Rs. 500/- (after crossing the turnover limit), under the Central Sales Tax Act, 1956 (CST Act), e-Registration Fee is applicable at Rs. 25/-, under the MVAT Act, for Voluntary e-Registration, fee is applicable at Rs. 5000/- and there is no Registration Fee under the Maharashtra State Tax on Professions, Trade, Callings and Employments Act, 1975 (PT Act).	It is totally online	Only fully filed, valid and correct e-Registration Forms are uploaded on the website of the Department. Those forms not fulfilling the above mentioned criterion, are not accepted by the portal and hence there is no need of the Appeal.	Only fully filed, valid and correct e-Registration Forms are uploaded on the website of the Department. Those forms not fulfilling the above mentioned criterion, are not accepted by the portal and hence there is no need of the Appeal.

	3) If the Application is complete in all the aspects then issuing Registration Number	If the Application is fully filed, valid and correct then (i) If Single Registration Application is used for MVAT Act, CST Act and PT Act then Registration Certificate will be issued within 7 working days after verification (which includes time required for verification). If the Registration Certificate is rejected, then it will be communicated to the Applicant within 7 working days. (ii) If the Applicant applies for registration under PT Act only, then Registration Certificate will be issued within 1 day.	Free of cost	For (i) in Column No. (3): Concerned Stater Tax Officer of Nodal Division.	(a)For (i) in Column No. (3): If the Application is fully filed, valid and correct then system generates Registration Certificate No. within stipulated time. Hence there is no need of appeal against it. But if the service is not received within time period then Controlling Officer of the Designated Officer. (b) For (ii) in Column No. (3): As per the attached Annexure	(a) For (i) in Column No. (3): Controlling Officer of the First Appellate Authority. (b) For (ii) in Column No. (3): As per the attached Annexure.
(2)	**Central Sales Tax Statutory Electronic Declarations the Central Sales Tax Act, 1956.**					
	1)Making available application for statutory electronic declarations under the Central Sales Tax on the portal of the Department www.mahagst.gov.in	Immediate (24*7)	Free of Cost	Respective Nodal Officer	As application mentioned in Column No. (2) is available on the portal of the Department, there no need of the Appeal.	As application mentioned in Column No. (2) is available on the portal of the Department, there no need of the Appeal.
	2) Accepting applications required for issuance of statutory electronic declarations under the Central Sales Tax Act and providing acknowledge for the same.	Immediate (24*7)	Free of Cost	Respective Nodal Officer	Only fully filed, valid and correct applications are uploaded on the portal of the Department. Applications not fulfilling the above mentioned conditions are not	Only fully filed, valid and correct applications are uploaded on the portal of the Department. Applications not fulfilling

					accepted by the portal and hence there is no need of the appeal.	the above mentioned conditions are not accepted by the portal and hence there is no need of the appeal.
	3) Making available to the dealers Digitally Signed Statutory Electronic Declarations on his email ID as per 2(2) mentioned above.	If the application is fully filed, valid and correct then e-CST declarations will be issued within 7 working days after verification (which includes time required for verification) and will be forwarded on the registered email ID of the dealer.	Free of Cost	Respective Nodal Officer	If the Application is fully filed, valid and correct then system generates digitally signed e-CST declarations. Hence there is no need of appeal against it. But if the service is not received within time period then Controlling Officer of the Designated Officer.	Controlling Officer of the First Appellate Authority.
(3)	**e-Returns under the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (MVAT Act), Central Sales Tax Act, 1956 (CST Act) and Maharashtra State Tax on Professions, Trade, Callings and Employments Act, 1975 (PT Act).**					
	1)Making available e-Return Forms under the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (MVAT Act), the Central Sales Tax Act, 1956 (CST Act) and the Maharashtra State Tax on Professions, Trade, Callings and Employments Act, 1975 (PT) on the portal of the Department www.mahagst.gov.in	Immediate (24*7)	Free of Cost	In case of any difficulty in getting this service, dealers can lodge the complaint on the portal of the Department www.mahagst.gov.in or directly to the Nodal Officer or can call on the Help Line provided by the Department. After that, issue is resolved	Controlling Officer of the Designated Officer.	Controlling Officer of the First Appellate Authority.

				through Designated Officer (Deputy Commissioner, Assistant Commissioner, State Tax Officer)		
	2) Making available to the dealer acknowledgement of the e-Return submitted by him on the portal of the Department www.mahagst.gov.in	Immediately after submission of the e-Return.	A) For MVAT Act & CST Act: 1) Free of cost if filed before due date. 2) Late Fee at Rs. 1000/- is applicable if filed within one month after due date. 3) Late Fee at Rs. 5000/- is applicable if filed after one month from due date. B) For PT Act: Late Fee at Rs. 1000/- is applicable if not filed on or before due date.	Only fully filed, valid and correct e-Returns are uploaded on the portal of the Department. In case of any difficulty in getting this service, dealers can lodge the complaint on the portal of the Department www.mahagst.gov.in or directly to the Nodal Officer or can call on the Help Line provided by the Department. After that, issue is resolved through Designated Officer (Deputy Commissioner, Assistant Commissioner, State Tax Officer)	Controlling Officer of the Designated Officer.	Controlling Officer of the First Appellate Authority.
(4)	**e-Payment under the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (MVAT Act), Central Sales Tax Act, 1956 (CST Act) and Maharashtra State Tax on Professions, Trade, Callings and**					

	Employments Act, 1975 (PT Act).					
	Dealer can make e-Payment from the website of the Department www.mahagst.gov.in in challan in Form MTR-6 prescribed under Maharashtra Treasury Rules.	Immediate (24*7)	Free of Cost	In case of any difficulty in getting this service, dealers can lodge the complaint on the portal of the Department www.mahagst.gov.in or directly to the Nodal Officer or can call on the Help Line provided by the Department. After that, issue is resolved through Designated Officer (Deputy Commissioner, Assistant Commissioner, State Tax Officer)	Controlling Officer of the Designated Officer.	Controlling Officer of the First Appellate Authority.

Annexure

Sr. No.	Location	First Appellate Authority	Second Appellate Authority
1	Ahmednagar	AHM-VAT-E-001	NAS-PTO-F-001
2	Akola	AKO-VAT-E-001	NAG-PTO-F-001
3	Alibag	ALI-VAT-E-001	THA-PTO-F-001
4	Amravati	AMR-VAT-E-001	NAG-PTO-F-001
5	Aurangabad	AUR-VAT-E-001	NAS-PTO-F-001
6	Barshi	BAR-VAT-D-001	KOL-PTO-F-001
7	Beed	BEE-VAT-D-001	NAS-PTO-F-001
8	Bhandara	BHA-VAT-D-001	NAG-PTO-F-001
9	Bhayandar	BHY-VAT-E-001	THA-PTO-F-001
10	Chandrapur	CHA-VAT-E-001	NAG-PTO-F-001
11	Dhule	DHU-VAT-E-001	NAS-PTO-F-001
12	Gadchiroli	GAD-VAT-D-001	NAG-PTO-F-001
13	Gondia	GON-VAT-E-001	NAG-PTO-F-001
14	Hingoli	HIN-VAT-D-001	NAG-PTO-F-001
15	Jalgaon	JAG-VAT-E-001	NAS-PTO-F-001
16	Jalna	JAL-VAT-E-001	NAS-PTO-F-001
17	Kalyan	KAL-VAT-E-001	THA-PTO-F-001
18	Khamgon	KHA-VAT-E-001	NAG-PTO-F-001
19	Kolhapur	KOL-VAT-E-001	KOL-PTO-F-001
20	Latur	LAT-VAT-E-001	NAG-PTO-F-001
21	Malegaon	MAL-VAT-E-001	NAS-PTO-F-001
22	Mumbai	MUM-PTO-E-001	MUM-PTO-F-001
23	Nagpur	NAG-PTO-E-001	NAG-PTO-F-001
24	Nanded	NAN-VAT-E-001	NAG-PTO-F-001
25	Nandurbar	NAD-BCP-E-001	NAS-PTO-F-001
26	Nashik	NAS-VAT-E-001	NAS-PTO-F-001
27	Oros	ORO-VAT-E-001	KOL-PTO-F-001
28	Osmanabad	OSM-VAT-D-001	KOL-PTO-F-001
29	Palghar	PAL-VAT-E-001	THA-PTO-F-001
30	Parbhani	PAR-VAT-D-001	NAG-PTO-F-001
31	Pune	PUN-PTO-E-001	PUN-PTO-F-001
32	Raigad	RAI-VAT-E-001	THA-PTO-F-001
33	Ratnagiri	RAT-VAT-E-001	KOL-PTO-F-001
34	Sangali	SAN-VAT-E-001	KOL-PTO-F-001
35	Satara	SAT-VAT-E-001	KOL-PTO-F-001
36	Solapur	SOL-VAT-E-001	KOL-PTO-F-001
37	Thane	THA-VAT-E-001	THA-PTO-F-001
38	Wardha	WAR-VAT-D-001	NAG-PTO-F-001
39	Washim	WAS-VAT-D-001	NAG-PTO-F-001
40	Yavatmal	YAV-VAT-E-001	NAG-PTO-F-001